# शिक्षण उपसंचालक कार्यालय,पुणे विभाग,पुणे

१७ डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे-४११००१
ई-मेल- dydpune@gmail.com इ.११ वी ऑनलाईन प्रवेशाचा ई-मेल- 11thonlineadmissiondydpune@gmail.com
दुरध्वनी क्र.०२०- २६१२२२१७ वेबसाईट- WWW.dydepune.com

## इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१७-१८ प्रसिद्धी निवेदन
## दिनांक :१९/०७/२०१७ .(दुसरी फेरी)

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११वी सन २०१७-१८ ची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. केंद्रिय प्रवेश नियंत्रण समितीने जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाईन प्रवेश दुसरी फेरी दि. १५.०७.२०१७ ते १८.०७.२०१७ अखेर पर्यंत विद्यार्थ्यांना भाग-१ व भाग-२ भरणे, अद्याप फॉर्म न भरलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशाचा भाग-१,भाग-२ पुर्ण करणे व २ ते १० क्रमांकाचा पसंतीक्रम अॅलॉट होवुन प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम बदलेले व पुर्वीचेच पसंतीक्रम पुढे चालु ठेवलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाचे संकेतस्थळावर दि. १८.०७.२०१७ अखेर सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यात आलेले होते.

दुसरी गुणवत्ता यादी दि. २०.०७.२०१७ रोजी सायं. ५.०० वाजता जाहीर करण्यात येणार आहे. त्यामध्ये पुढील प्रमाणे विद्यार्थी सहभागी होतील.

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | एकुण प्रवेश क्षमता | ९१६७० |
| २ | एकूण अर्ज प्राप्त (पहिली फेरी) | ७८४३८ |
| ३ | पहिली गुणवत्ता यादीत दिलेले प्रवेश | ४८२५० |
| ४ | पहिल्या गुणवत्ता यादीनुसार झालेले प्रवेश | २४६६३ |
| ५ | पहिल्या फेरीत रद्द केलेले प्रवेश | ३२५ |
| ६ | पहिल्या फेरीत नाकारलेले प्रवेश | ७४ |
| ७ | Not Reported | २३१८८ |
| **८** | **दुस-या फेरीसाठी पात्र विद्यार्थी संख्या** | **५५२८७** |

दुसरी गुणवत्ता यादी प्रवेशाच्या संकेतस्थळवर दि. २०.०७.२०१७ रोजी सायं. ५.०० वाजता प्रसिध्द करण्यात येईल, विद्यार्थ्यांनी सायंकाळी ५.०० वाजलेनंतर आपणांस कोणते कॉलेज अॅलॉट झालेले आहे ते ऑनलाईन फॉर्म नंबर टाकून पहावे. दुस-या गुणवत्ता यादीत पहिल्या पसंतीक्रमांचे कॉलेज मिळालेले असल्यास त्या सर्व विद्यार्थ्यांनी संबधित कॉलेज मध्ये जाऊन प्रवेश घेणे बंधनकारक असेल. तसेच दिलेल्या वेळापत्रकानुसार विहित मुदतीत ऑनलाईन प्रवेश कॉलेजमध्ये जाऊन निश्चित न केल्यास अशा पहिल्या पसंतीक्रमाचे कॉलेज मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील फेरीसाठी प्रतिबंधीत (**Block**) करण्यात येईल.

पसंतीक्रम नंबर २ ते १० पैकी कोणत्याही क्रमांकाचे कॉलेज मिळालेले असल्यास व ते विद्यार्थ्यांस मान्य असल्यास अशा कॉलेजमध्ये जाऊन विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश विहित घ्यावेत.

**सदरचे प्रसिध्दीनिवेदन या कार्यालयाच्या** www.dydepune.com **व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या** http://pune.11thadmission.net **या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**(दिनकर टेमकर)**
**अध्यक्ष**
**इ.11 वी ऑनलाईन केंद्रिय प्रवेश नियंत्रण समिती, पुणे**
**तथा**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग पुणे-१.**

**press note 2017-18 dt.19.7.2017**